" अंतरी पेटवू ज्ञानज्योत "

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.**

जा.क्र. उमवि/५-ए/ज-५८/ १७६९/२००१ दिनांक : ३१/५/२००१

प्रति,

मा.अध्यक्ष,

ग्रामविकास शिक्षण मंडळ,

मारवड,ता.अमळनेर, जि.जळगांव.

विषय :- शैक्षणिक वर्ष २००१ - २००२ पासून मारवड,ता.अमळनेर, जि. जळगांव येथे कला विद्याशाखेचे महाविद्यालय सुरू करणेस परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२, यांचे पत्र क्र. एनजीसी २०००/नमवि(२९८/२०००)/ मशि-३, दि. १४ मार्च,२००१

महोदय,

मारवड,ता.अमळनेर,जि. जळगांव येथे कला विद्याशाखेचे नवीन महाविद्यालय सुरू करण्यास शासनाने संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने विद्यापीठाची संलग्नता देण्यासंदर्भात तपासणी करून अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाद्वारा नियुक्त केलेल्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालास मा. कुलगुरूंनी, विद्या परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेस अनुसरून व प्राप्त आदेशावरून आपणास कळविण्यात येते की, स्थानिक चौकशी समितीच्या अहवालात नमूद अटींची पूर्तता करण्याच्या अटींवर आपल्या संस्थेस मारवड,ता.अमळनेर,जि. जळगांव येथे कला विद्याशाखेचे नवीन महाविद्यालय खालील विषयांसह शैक्षणिक वर्ष २००१-२००२ पासून सुरु करण्यास महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम १९९४ च्या कलम ८३ (४) नुसार मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता एक वर्षाकरिता राहील व सदर मान्यतेचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आवश्यक राहील याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

नव्याने विस्तार

प्रथम वर्ष कला - मराठी, सक्तीचे इंग्रजी, ऐच्छिक इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, हिंदी, भूगोल, राज्यशास्त्र, संरक्षणशास्त्र व समाजशास्त्र

अटी:-

१) संस्थेने वर्ग खोल्या, प्राचार्य दालन, शिक्षक दालन, महिला दालन, विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र प्रसाधन व्यवस्था, कार्यालय आणि क्रीडांगण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र शासन व उ.म.वि., जळगांव यांनी ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे प्राचार्य, व्याख्याते, ग्रंथपाल व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची वेळीच नेमणूक करणे आवश्यक आहे.

३) अ) रू.५०,०००/- किंमतीचे क्रमीक व संदर्भ ग्रंथ आणि रू.५,०००/- किंमतीची नियतकालिके शैक्षणिक वर्षात खरेदी करणे आवश्यक आहे.

ब) अध्यादेश १७२ एच मधील तरतूदीनुसार राखीव निधी, इमारत निधी, ग्रंथालय निधी, तूट निधींची गुंतवणूक राष्ट्रीयकृत बँकेत त्वरीत करण्यात यावी.

४) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८५ अन्वये स्थानिक व्यवस्थापन समिती त्वरीत गठीत करण्यात यावी.

५) शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी नेमणूक, विद्यार्थी प्रवेश अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांकडून घेतले जाणारे शुल्क इत्यादीबाबतीत शासनं व विद्यापीठ नियमांचे पालन करण्यात यावे.

कळावे,

आपला विश्वासू,

सोबत :-स्थानिक चौकशी समितीच्या अहवालाची प्रत.

उप कुलसचिव (संलग्नता)

**प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर :-**

१) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-१.
३) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव विभाग, २०, रामदास कॉलनी, जळगांव.
४) विद्यापीठातील सर्व मा.विभाग प्रमुख

एसएस१//एसएच/पे.नं.७५-७६/

प्राचार्य

**North Maharashtra University, Jalgaon**
Outward No. NMU/5-A/J-58/769/2001 Date 31/5/2001

To,
The President,
Gram Vikas Shikshan Mandal,
Marwad, Tal.Amalner, Dist. Jalgaon

Subject: - To permit Arts college at Marwad Tal.Amalner, Dist. Jalgaon from academic year 2001-2002

Ref : - Letter of Higher Education of Maharashtra Government Mantralaya Vistar Bhavan Mumbai -32
NGC 2000/NMU/[298/2007]/MS-3 Date 14 March 2001

Sir,

You are conveyed that above mentioned subject and reference to permit arts faculty at Marwad Tal.Amalner, Dist. Jalgaon. The permission is according to University local management committee's report which is approved by V.C. on behalf of management councile of University. The permission is depend upon fullfillling the conditions laid by Local management committee's report.

According to Maharashtra University regulation act 1994 sub section 83[4] the permission is granted to start new Arts faculty college at Marwad
Tal.Amalner, Dist. Jalgaon from academic year 2001-2002

The permission is only for a year and time to time it should be affiliated Please note this.

New Extention -

First Year Arts - Marathi, Com.English, Optional English, History, Economics, Hindi, Geography, Politics, Defence Study, Sociology

Conditions -

1] Institute / Trust should provide the class rooms Principal cabin staffroom, Ladies room, Toilet for ladies and Gents, Office Play ground,
2] Appointment of Principal, Lecturers, Librarian, and Physical director should be according to government and N.M.U. Jalgaon rules.
3] A] To purches Rs.50,000/- text books and Rs.5000/- magzins, weekly in the academic year.
B] To provision of reserve fund building fund, library fund, difference fund should be fixed deposited in nationalize bank according to rule 172 H.
4] To organize local management committee according to provision of Maharashtra Univesity act 1994 section 85.
5] To obey the rules and regulations of Government and University considering appoinments of teacher non-teaching staff, Entrance exam, fees collected by students.

Thank You.

Yours faithfully,
Sd/-

Encl - Report of LIC committee Forworded to take necessary action
1] Secretary, Maharashtra Governement, Higher Education Mumbai.
2] Director, Higher Education dept. M.S.Pune
3] Joint Director, Higher EducationJalgaon
4] Head of Dept. in University

PRINCIPAL
Late Nhanbhau Mansaram Tukaram Patil
Arts College, Marwad
Tal. Amalner, Dist.Jalgaon